## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ मे २०११

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक परीक्षा. २०१०/२३४/प्र.क्र. २५/(३)/२०१०/१७.— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालय सेवा (कक्ष अधिकारी) विभागीय परीक्षा नियम, १९७७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत, ते असे :—

१. या नियमांना महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालय सेवा (कक्ष अधिकारी) विभागीय परीक्षा (सुधारणा) नियम, २०११ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालय सेवा (कक्ष अधिकारी) विभागीय परीक्षा नियम, १९७७ मधील परिशिष्ट-अ मध्ये नोंद क्रमांक चार समोर " विषय " हे शीर्षक असणाऱ्या रकान्यामध्ये उपनोंद क्रमांक (ई) नंतर खालीलप्रमाणे उपनोंद समाविष्ट करण्यात येईल, ती अशी

(फ) मा. संसद सदस्यांना आणि राज्य विधानमंडळ सदस्यांना महाराष्ट्र शासनाच्या कार्यालयांमध्ये सौजन्यपूर्ण वागणूक देण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श्री. प्र. पाटील,
शासनाचे सह सचिव.